दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ६ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६१ । पाने ६।

DIGITAL EDITION


भाजपा सिख अल्पसंख्यांक मोर्चातर्फे वृक्षारोपण अभियान

(पान ६ वर)



» Selected

## नीट परीक्षेत पुणे, लातूर केंद्रावर विशेष लक्ष ठेवा

मुंबईः 'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा' (नीट) देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री कार्यालयाचे अप्पर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्त शिरीष जैन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारचा मोठा निर्णय • मराठा विद्यार्थ्यांना ओबीसींसारख्या सवलती

# मराठा समाजासाठी सरकारचा ऐतिहासिक निर्णय!

## ओबीसी धर्तीवरील ८ कल्याणकारी योजना लागू, व्यावसायिक शिक्षण व रोजगार प्रशिक्षणाचा लाभ

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या विविध योजनांच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल आठ कल्याणकारी योजना सुरू करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता, त्यानंतर आता शैक्षणिक सवलतींसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा मोठा आणि ऐतिहासिक असा निर्णय घेण्यात आला आहे.**

या निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थी, युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयानुसार मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे कोणत्या योजना लागू केल्या गेल्या आहेत.

**वाहन चालक आणि वाहक प्रशिक्षण योजना**

मराठा समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक आणि वाहक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती**

इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेली



शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू होणार आहे.

**शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती**

उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या विविध शुल्कांची रक्कम शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना परत दिली जाणार आहे. यामध्ये विविध शैक्षणिक खर्चांचा समावेश असेल.

**परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ**

महाराष्ट्रातील मराठा विद्यार्थी राज्याबाहेरील अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यास त्यांनाही या योजनेचा लाभ मिळेल.

**सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पात्रता**

ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सवलती मिळतात, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र राहतील.

**संस्थास्तरावरील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही लाभ**

केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती मिळतील. भविष्यातील सर्व नवीन सवलती आपोआप लागू यापुढे ओबीसी प्रवर्गासाठी ज्या नवीन शैक्षणिक सवलती किंवा सुविधा जाहीर केल्या जातील, त्या स्वतंत्र आदेशाशिवाय मराठा समाजालाही आपोआप लागू होतील. ही या निर्णयातील सर्वात महत्त्वाची तरतूद मानली जात आहे. निर्णयावरून वादाची ठिणग

दरम्यान, सरकारच्या या निर्णयावरुन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आक्षेप नोंदवला असून, ओबीसी समाजासाठी लागू असलेल्या योजनांचा विस्तार मराठा समाजापर्यंत करताना मूळ लाभार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम होणार नाही

**'ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणारा निर्णय'**

"मराठा समाजासाठी लोककल्याणकारी महाराष्ट्राच्या संकल्पनेतून कोणाची मागणी आली आणि त्यांच्या मागण्या पूर्ण करणे हा शासनाचा अधिकार आहे. पण ज्यावेळी ओबीसी आरक्षणाच्या धर्तीवरील सवलती मराठा समाजाला दिल्या जातात, त्यावेळी त्या ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या ठरू शकतात. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून कोणाला काय द्यायचे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र जे मोर्चे काढू शकतात, सरकारवर दबाव आणू शकतात, त्यांच्या मागण्यांकडे अधिक गांभीर्याने पाहिले जाते. घटनात्मक पाया तपासल्याशिवाय निर्णय घेतले जातात, ही चिंतेची बाब आहे.

---


जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# भरधाव कारची दुचाकीला धडक

## महिलेसह चौघांचा दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स

**वरणगाव | प्रतिनिधीः** वरणगाव शहराजवळील राष्ट्रीय महामार्गावर भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत महिलेसह चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी दुपारी घडली. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कपिलनगर भागावर शोककळा पसरली आहे.रणगावजवळील राष्ट्रीय महामार्गावर दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या चौघांना एमएच १९ ईव्ही ५३५३ क्रमांकाच्या भरधाव चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की दुचाकीवरील सर्वजण गंभीर जखमी झाले. या अपघातात जय शंकर काळे, ऐश्वर्या बहाद्दूर भोसले (वय ३०), विघ्नेश शंकर चव्हाण (वय १४) आणि मोनालिसा शिवबसप्पा भोसले (वय १) हे गंभीर जखमी झाले होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले .आणि जखमींना त्वरित जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल केले.



**संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण**

मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर चौघांनाही मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. अपघाताचे नेमके कारण आणि संबंधित चारचाकी वाहनचालकाची जबाबदारी याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

---

# जळगाव पालिकेत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेळेवर उपस्थितीसाठी महापौरांचे कठोर निर्देश

## नागरिकांच्या तक्रारींची दखल; कार्यालयीन शिस्त पाळून प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे आदेश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधीः** जळगाव महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेळेवर उपस्थितीबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापौर दीपमाला मनोज काळे यांनी प्रशासनाला कठोर निर्देश दिले आहेत. महापालिकेतील सर्व विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करून नागरिकांची कामे तत्परतेने मार्गी लावावीत, असे आदेश त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत. यासंदर्भात महापौर दीपमाला काळे यांनी आयुक्तांना लेखी पत्र पाठवून शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींकडे



लक्ष वेधले आहे. त्यांनी पत्रात नमूद केले आहे की, जळगाव शहराचा सातत्याने विस्तार होत असून शहरासह उपनगरांमधील लोकसंख्येतही मोठी वाढ झाली आहे. परिणामी महापालिकेच्या विविध विभागांमध्ये नागरिकांची वर्दळ वाढली असून विविध कामांसाठी त्यांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. महापौरांनी स्पष्ट केले आहे की, अनेक नागरिकांनी तक्रारीद्वारे काही अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयीन वेळेत आपल्या जागेवर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे नागरिकांना संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी भेटत नसल्याने त्यांची कामे रखडत असून अनावश्यक वेळ आणि श्रम खर्च करावे लागत आहेत. विशेषतः कार्यालयीन वेळेत वैयक्तिक कामांसाठी बाहेर जाणे, चहापान अथवा इतर कारणांमुळे दीर्घकाळ अनुपस्थित राहण्याच्या प्रकारांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पत्रात पुढे महापौरांनी सांगितले आहे की, महापालिकेच्या प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक आहे.

---

# जळगावात 'एक पेड़ देश के नाम' उपक्रम उत्साहात!

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भाजप महानगरतर्फे वृक्षलागवड व संगोपनाचा संकल्प

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत भारतीय जनता पक्ष जळगाव महानगरच्या वतीने 'एक पेड़ देश के नाम' या संकल्पनेअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अभियानात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. ५ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे मार्गदर्शन जळगाव शहराचे आमदार राजूमामा भोळे आणि भाजप महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी यांनी केले. मंडळ क्रमांक १ ते ५ मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी केवळ वृक्षलागवड न करता त्यांच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारीही स्वीकारण्यात आली. मंडळ क्रमांक १ अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज मंडळाच्या वतीने प्रजापतनगर, मामुराबाद रोड परिसरात विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला पर्यावरण दिनाचे सहसंयोजक राजू मराठे, मंडळाध्यक्ष आनंद सपकाळे, सरचिटणीस राहुल सनकत, नगरसेवक निलेश तायडे, पूजा जगताप, विजय बांदल, संदीप ढढोरे, महेश चौधरी, संजय शिंदे, राहुल घोरपडे, तुषार सूर्यवंशी, दीपक कोळी, नितीन साळुंखे, वसीम शेख, संगीता पाटील, चित्रा मालपाणी, राजश्री सोनवणे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मंडळ क्रमांक ३ मध्येही 'एक पेड़ देश के नाम' अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आमदार राजूमामा भोळे, महानगराध्यक्ष दीपक सूर्यवंशी, नगरसेविका उज्वलाताई बेंडाळे, जिल्हा सरचिटणीस नितीन इंगळे, नगरसेवक नितीन सपके, नितीन बरडे, सुरेखा तायडे, गायत्री राणे, मंडळाध्यक्ष अजित राणे, दीपक परदेशी, संयोजक जितेंद्र चव्हाण यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज अधिक महत्त्वाची बनली आहे. याच उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे आणि पर्यावरण संरक्षणात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असा संदेश या अभियानाच्या माध्यमातून देण्यात आला. 'एक पेड़ देश के नाम' या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक सहभाग आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले.

---

# होर्मूज संकटात भारतासाठी दिलासादायक बातमी!

## अंदमान समुद्रात नैसर्गिक वायूचा मोठा साठा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** मध्य पूर्वेतील तणाव आणि होर्मूज सामुद्रधुनीवरील अनिश्चिततेमुळे भारतासमोर निर्माण झालेल्या ऊर्जा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची सकारात्मक घडामोड समोर आली आहे. अंदमान समुद्र परिसरात नैसर्गिक वायूच्या विहिरींचा शोध लागल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिली असून, यामुळे भविष्यात देशाच्या ऊर्जा सुरक्षेला मोठे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे होर्मूज सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. या परिस्थितीमुळे भारतासह अनेक देशांच्या ऊर्जा पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला असून कच्च्या तेलाच्या किमतीतही चढ-उतार पाहायला मिळत आहेत. अशा परिस्थितीत अंदमान समुद्रातील नैसर्गिक वायूच्या संभाव्य साठ्यांचा शोध भारतासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सामाजिक माध्यमांद्वारे ही माहिती देताना संबंधित संशोधन आणि शोध मोहिमेत सहभागी संस्थांचे अभिनंदन केले आहे. या नव्या शोधामुळे देशांतर्गत नैसर्गिक वायू उत्पादन वाढविण्यास मदत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, देशांतर्गत ऊर्जा स्रोतांचा विकास झाल्यास आयातीवरील अवलंबित्व कमी होऊ शकते आणि दीर्घकालीन दृष्टीने ऊर्जा क्षेत्र अधिक सक्षम होण्यास मदत मिळू शकते. मात्र, सापडलेल्या साठ्याचे व्यावसायिक उत्पादन सुरू होण्यासाठी पुढील तांत्रिक



चाचण्या, मूल्यांकन आणि विकास प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. दरम्यान, पाकिस्तानातील सिंध प्रांतातही कच्च्या तेलासह नैसर्गिक वायूचे साठे आढळल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्या देशालाही ऊर्जा क्षेत्रात काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. होर्मूज परिसरातील भू-राजकीय तणाव कायम असताना भारतात नैसर्गिक वायूच्या नव्या स्रोतांचा शोध लागणे ही ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

**साठ्यांचा शोध भारतासाठी महत्त्वाचा**

या परिस्थितीमुळे भारतासह अनेक देशांच्या ऊर्जा पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला असून कच्च्या तेलाच्या किमतीतही चढ-उतार पाहायला मिळत आहेत. अशा परिस्थितीत अंदमान समुद्रातील नैसर्गिक वायूच्या संभाव्य साठ्यांचा शोध भारतासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सामाजिक माध्यमांद्वारे ही माहिती देताना संबंधित संशोधन आणि शोध मोहिमेत सहभागी संस्थांचे अभिनंदन केले आहे. या नव्या शोधामुळे देशांतर्गत नैसर्गिक वायू उत्पादन वाढविण्यास मदत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# तुकाराम मुंडेंचे आदेश; धुळ्यात अन्न व औषध प्रशासनाचा डबल धमाका

## १८.५० लाखांचा गुटखा जप्त; आक्षेपार्ह दावे करणाऱ्या पतंजलीच्या २० उत्पादनांवरही कारवाई

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात बेकायदेशीर अन्नपदार्थ व औषधांविरोधात कारवाईचा धडाका सुरू केला असून, त्याचाच प्रत्यय धुळे जिल्ह्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने एका दिवसात दोन महत्त्वाच्या कारवाया करत गुटख्याचा मोठा साठा जप्त केला, तर दुसरीकडे आक्षेपार्ह जाहिरातींद्वारे विविध आजार बरे करण्याचा दावा करणाऱ्या पतंजलीच्या २० हून अधिक उत्पादनांवर कारवाई करून ती जप्त व सील करण्यात आली. पहिल्या कारवाईत मध्य प्रदेशातून पनवेलकडे जाणाऱ्या एका वाहनाची सोनगीर गावाजवळ



तपासणी करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सोनगीर पोलिसांच्या मदतीने केलेल्या या कारवाईत तब्बल १८ लाख ५० हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी वाहनचालक सुरेशकुमार बिरबल राम गुवरिया (रा. राजस्थान) याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत धुळे शहरातील पतंजली शॉपिंग मॉलवर धाड टाकण्यात आली. तपासादरम्यान विविध आजारांवर उपचार किंवा आजार पूर्णपणे बरे करण्याचा दावा करणाऱ्या उत्पादनांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित उत्पादनांचा साठा जप्त करून सील करण्यात आला. कारवाई करण्यात आलेल्या उत्पादनांमध्ये नारी कांती सिरप, मधुग्रिट टॅब, रेनोग्रीट टॅब, सीसटो ग्रीट टॅब, मेलानो ग्रीट टॅब, मेदोहर वटी टॅब, मेदा वटी टॅब, अर्जुना कांती यांसह मधुमेह, किडनी स्टोन, कर्करोग, कुष्ठरोग आदी आजारांवर परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या विविध उत्पादनांचा समावेश आहे. अन्न व औषध प्रशासनाने सुमारे २७ हजार रुपये किमतीची २० हून अधिक उत्पादने जप्त करून सील केली असून, संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानंतर सुरू झालेल्या या धडक कारवाईमुळे गुटखा माफिया तसेच नियमबाह्य पद्धतीने औषधांची विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**संबंधित उत्पादनांचा साठा जप्त करून सील**

पहिल्या कारवाईत मध्य प्रदेशातून पनवेलकडे जाणाऱ्या एका वाहनाची सोनगीर गावाजवळ तपासणी करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सोनगीर पोलिसांच्या मदतीने केलेल्या या कारवाईत तब्बल १८ लाख ५० हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी वाहनचालक सुरेशकुमार बिरबल राम गुवरियायाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित उत्पादनांचा साठा जप्त करून सील करण्यात आला. कारवाई करण्यात आलेल्या उत्पादनांमध्ये नारी कांती सिरप, मधुग्रिट टॅब, रेनोग्रीट टॅब, सीसटो ग्रीट टॅब, मेलानो ग्रीट टॅब, मेदोहर वटी टॅब, मेदा वटी टॅब, अर्जुना कांती यांसह मधुमेह, किडनी स्टोन, कर्करोग, कुष्ठरोग आदी आजारांवर परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या विविध उत्पादनांचा समावेश आहे.

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33-0714843
। शनिवार, दि. ६ जून २०२६ ।

लोकनेता
गुलाबराव पाटील वाढदिवस विशेषांक!





## शाश्वत समृद्धीचा मार्ग आखणारे संकल्पक, पालकमंत्री गुलाबरावजी पाटील


# ४२ नालेखोलीकरण, ८९ गावांना होणार फायदा, ३१० किलोमीटर पर्यंत जमीन होणार सुपीक








**मातीच्या काळजाची हाक ऐकून, प्रत्यक्ष बांधावर उतरून सुरु आहे जलसंकल्प पूर्ण करण्याचे ध्येय. धरणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भविष्यातील जलसमृद्धीचे नियोजन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. धरणगाव तालुक्यात जलसंधारणासाठी ३१० ते ४२५ किलोमीटरचे नाले व नदीपात्र खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे महाअभियान सुरू आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजल पातळी वाढण्यास आणि दुष्काळग्रस्त भागाला मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. ही योजना नाही, ही एक लोकचळवळ आहे. नाले खोलीकरण न झाल्यास व वेळीच उपाययोजना न केल्यास आपला तालुका भविष्यात ' डार्क झोन' मध्ये जाण्याची शक्यता ओळखून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी हा सकंल्प केला आहे. धरणगावचा विकास तेव्हाच होईल, जेव्हा पाणी अडविले जाईल. नालाखोलीकरणाचा हा पहिला टप्पा आहे, या नुसार जिल्हाभरात हा 'जलसंकल्प ' प्रकल्प राबविला जाणार आहे. हजारो कुटूंबाच्या उज्जवल भविष्यासाठी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहनही पालकमंत्री गुलाबरावजी पाटील यांनी जनतेला केले आहे.**

जळगाव ग्रामीण मधील शेत जमिनीची सुपीकता अधिक वाढावी, यासाठी सुरु असलेल्या नालेखोलीकरण अंतर्गत ' जलसंकल्प' या प्रकल्पातील कामांची पाहणी करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील सोबत जिल्हाधिकारी रोहन घुगे, शेतकरी, अभियंता व ग्रामस्थ

## विकासासाठी कटिबध्द





### कसा थांबणार दुष्काळ आणि पुराचे दुष्टचक्र

धरणगाव तालुका पारंपारिक शेतीवर अवलंबून आहे. पण आज आपण निसर्गाच्या लहरीपणात अडकलो आहोत. हे चक्र भेदण्यासाठी हा संकल्प प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न पाणीपुरवठा व स्वच्छता तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आखला आहे. यासंकल्पास मूर्त स्वरुप देण्यासाठी ' जीपीएस मित्र परिवार'यासह संपूर्ण ग्रामस्थांची मोलाची साथ लाभत आहे. पावसाळ्यात नद्या नाल्यांना येणारा पूर आणि पिकांचे नुकसान. उन्हाळा येताच आटणाऱ्या विहीरी आणि पाण्यासाठी होणारी वणवण. नदीपात्रात साचलेला गाळ आणि वाढलेल्या झुडपांमुळे कमी झालेली पाणी साठवण क्षमता यामुळे वाढणार आहे.

### नाले खोलीकरण न झाल्यास काय असेल धोका :-

वेळीच उपाययोजना न केल्यास आपला तालुका भविष्यात 'डार्क झोन' मध्ये जाण्याची शक्यता अधिक आहे. हे टाळण्यासाठी या प्रकल्पाला गती देण्याचे काम सुरु आहे.

### कसा आहे जळगाव ग्रामीणचा जलसंकल्प :-

या संकटावर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून एख धाडसी पाऊल उचलण्यात आले आहे.

### प्रकल्पातील मुख्य कामे :-

तालुक्यातील तब्बल २१० किमी लांबीच्या नाले व नदीपात्रांचे
खोलीकरण आणि रुंदीकरण.
- पात्रात साचलेला गाळ उपसणे आणि काठ बळकटीकरण
- आस्तित्वात असलेले बंधारे आणि के.टी.आर यांची आवश्यक दुरुस्ती.

### शेतकऱ्यांना मिळणार मोफत गाळ : काय होणार शेतकऱ्यांना फायदा :-

**सुपीक जमीन :** नाल्यातून उपसलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत आपल्या शेतात नेता येईल. ज्यामुळे जमिनीची सुपकता वाढेल.
**शाश्वत सिंचन :** भूर्गभातील पाणीपातळी वाढेल, ज्यामुळे खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामाची हमी मिळेल.
**पूर नियंत्रण :** पावसाचे पाणी थेट शेतात न शिरता, नाल्यांद्वारे योग्य प्रकारे साठवले जाईल.
: पर्यावरण रक्षण कोणतीही मोठी बांधकामे न करता नैसर्गिक खतांचे पुनरुज्जीवन होईल.

### धोरण आणि मार्गदर्शक तत्त्वे मुख्य उद्दिष्ट :-

भूपृष्ठावर पाणी साठवण्याऐवजी (बाष्पीभवन टाळण्यासाठी) नाल्याची खोली व रुंदी वाढवून पाणी जमिनीत मुरवणे हे या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.
**मर्यादा :** नाला खोलीकरणाचे काम हे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या माध्यमातून केले जात आहे. स्थानिक नियम पाळून खोलीकरण व रुंदीकरणाची कामे प्रामुख्याने दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या प्रवाहावरच हाती घेतली आहेत. सद्यस्थिती आणि निधीजलयुक्त शिवार २.०: 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अंतर्गत नाला खोलीकरण आणि रुंदीकरणाच्या कामांना राज्यभरात जळगाव जिल्ह्यात धरणगाव तालुक्यात गती देण्यात आली आहे. नवीन योजना आणि अनुदान: 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' आणि नाला खोलीकरण या योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी शासनाने भरीव तरतूद केली आहे.

धरणगाव तालुक्यात जलसंधारणासाठी ३१० ते ४२० किलोमीटरचे नाले व नदीपात्र खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे महाअभियान सुरू आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजल पातळी वाढण्यास आणि दुष्काळग्रस्त भागाला मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

### नाले खोलीकरण प्रकल्पाची सद्यस्थिती

कामाची व्याप्ती आणि नियोजन - पाळधी-चांदसर भागापासून सुरू झालेल्या या उपक्रमात धरणगाव तालुक्यात सुमारे ३१० किलोमीटर लांबीच्या नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केले जात आहे. यामध्ये खामखेडा ते झिरी नदीपर्यंत १० किलोमीटरचा पट्टा आणि शेरी परिसरातील ३ किलोमीटरच्या नाला खोलीकरणाचा समावेश आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कामामध्ये एकवाक्यता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्यासाठी 'यश इंजिनिअरिंग कन्सल्टन्सी'मार्फत तांत्रिक सर्व्हे पूर्ण करण्यात आला आहे. नाल्यांचा नैसर्गिक उतार, पाण्याचा प्रवाह आणि त्यांची पाणी साठवण क्षमता लक्षात घेऊन हे काम नियोजित केले जात आहे.

### ३५ किलोमीटर पर्यत नाले खोलीकरण पूर्णत्वाकडे

प्रगती आणि उद्दिष्ट मोहिमेच्या पहिल्या दीड महिन्यातच ३५ किलोमीटरपेक्षा अधिक नाले खोलीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरला पाहिजे या मुख्य उद्देशाने या प्रकल्पाची अंमलबजावणी होत आहे. या मोहिमेत नाला खोलीकरणासोबतच साठवण बंधाऱ्यांचे भूमिपूजन आणि शेतरस्त्यांचे लोकार्पणही करण्यात आले आहे. नालाखोलीकरण कामाची प्रत्यक्ष पाहणीही स्वत: गुलाबराव पाटील जिल्हाधिकारी रोहन घुगे व सबंधित अधिकारी, अभियंत्यांसोबत नियमित करतात. याला आधुनित तंत्रज्ञानाची जोड देत ' ड्रोन ' कॅमेऱ्यांच्या माध्यमातून ही पाहणी नुकतीच केली आहे.

**धरणगाव तालुक्यातील पूर आणि दुष्काळाचे दुष्टचक्र रोखण्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून ३५० किमी नदी-नाला खोलीकरणाचे महाअभियान सुरू आहे. सीएसआर निधी आणि लोकसहभागातून आकारास येणारा हा प्रकल्प तालुक्याला जलसमृद्धीकडे नेणारा ठरेल.**

### सर्वसमावेश आराखडा नेणार पूर्णत्वाकडे

उत्तर महाराष्ट्रातील या तालुक्यातील ८९ गावांचा तालुका पिढ्यानपिढ्या पारंपारिक शेतीवर अवलंबून , शेती व कष्टाचा वारसा लाभलेला हा प्रदेश. बदलत्या हवामानामुळे व भूर्गभातील पाणीपातळी घटले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे येथील शेतकरी दोन टोकाच्या संकटात अडकले आहे. पावसाळ्यात तापी, गिरणा, अंजनी व झिरी नद्यांच्या उपखोऱ्यात नाले ओसंडून वाहतात, ज्यामुळे पुर येतो, आणि उन्हाळा येताच याच भूमीला तहान लागते. खरीप हंगाम पावसाच्या लहरीपणामुळे बारगळतो, नंतर रब्बी हंगाम घेणे देखील शाश्वत नसते. तसेच धरणगाव तालुक्यातील काही गावातील जमिनीतील पाण्याचा गावात अतिउपसा झाल्याने भविष्यात 'डार्क झोन' मध्ये जाण्याची भिती वाढली आहे. ३५० किलोमीटर लांबीचे नाले आणि नदीपात्र आज गाळाने भरले आहे. झाडी झुडपी, केरकचरा अतिक्रमणाने आकसले गेले आहे. यासंकटावर कायमस्वरुपी मात करण्यासाठी शेतकरी, शेती आणि माती यात रमणारे शेतकरी पुत्र जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून त्यांनी एक सर्वसमावेश आराखडा तयार केला आहे. तांत्रिक पाहणी अंती अस लक्षात आलं की तालुक्यातील एकूण ३५० किलोमीटर पैकी तब्बल २१० किलोमीटर लांबीच्या नाले व नदीपात्राची वहन क्षमता कमालीची घटली आहे. गाळ साचल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी थेट वाहून जाते. किंवा शेतात शिरून पीकांचे नुकसान करते. भूर्गभातील पाणी पातळी खालावल्याने तालुक्यातील विहीरे आणि बोअरवेल जानेवारीतच कोरड्या पडू लागतात. यामुळे पावसाळ्यापूर्वीच कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

### काय आहेत चार प्रमख उपाययोजना :-

- नाला खोलीकरण
- रूंदीकरण
- गाळ उपसा
- काठ बळकटीकरण

:( पाणी प्रवाह व्यवस्थापन ) यामुळे प्रत्येक थेंब अडविण्याचा प्रयत्न केला जाईल.
सर्व्हे अंतर्गत नाले खोलीकरण व रुंदीकरण अस्तित्वात असलेल्या जलसंधारण,बंधारे, नवीन बंधारे आणि केटीवेअर यांच्या आवश्यक दुरुस्ती गरजेनुसार करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना नालखोलीकरण रुंदीकरून यातून उपसा झालेला गाळ शेतकऱ्यांना आपल्या शेतात वाहून नेता येईल. त्यामुळे जमिनीची सुपकता वाढविता येईल. याकरिता पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सीएसआर निधीच्या माध्यमातून धरणगाव तालुका जलसमृद्ध करण्याचा धाडसी निर्धार केला आहे. यासाठी एकूण अंदाजित ११ . ६५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे त्यांचे शाश्वत विकास व शाश्वत शेतीचे त्यांचे शेतकऱ्यांसाठीचे स्वप्न पूर्णत्वास येणार आहे. या प्रकल्पाचे परिणाम केवळ जमिनीवरच नाही, तर लोकांच्या आयुष्यावरही होतील. भुजल पुर्नभरण, पूरनियंत्रण, शेती विस्तार, पर्यावरण रक्षण. कोणतीही बांधकाम न करता नैसर्गिक स्त्रोतांचे पुर्नजीवन केल्याने पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. धरणगावचा हा जलसंकल्प हा केवळ प्रकल्प नाही, तर हे एक लोकचळवळीचे स्वरुप आहे. हजारो कुटूंबाच्या भविष्याची सुरक्षा आहे, जेव्हा पाणी अडविले जाईल, तेव्हाच धरणगावचा विकास खऱ्या अर्थाने भरभराटीस येईल यात शंका नाही.



जळगाव ग्रामीण मधील शेती शिवारात सुरु असलेले नाले खोलीकरणाचे काम

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. ६ जून २०२६ ।











महाराष्ट्राचे शिवसेना नेते

जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

# मा.ना.श्री. गुलाबरावजी पाटील साहेब

आपणांस वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



# खान्देशाचा बुलंद आवाज, विकासाचे अष्टपैलू नेतृत्व

अष्टपैलू नेतृत्व, अमोघ वक्तृत्व आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांची अचूक जाण असलेले राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील (भाऊ) यांच्या वाढदिवसानिमित्त जळगाव जिल्ह्यातील राजकीय वातावरण विविध पक्षांच्या नेत्यांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या सदिच्छांनी न्हाऊन निघाले आहे. सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत आपल्या अथांग कर्तृत्वाच्या, संघटन कौशल्याच्या आणि बाळासाहेबांच्या विचारांशी असलेल्या एकनिष्ठेच्या बळावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे एक वेगळे आणि अढळ स्थान निर्माण केले आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून संपूर्ण जिल्ह्याचा आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे, हेच त्यांच्या राजकीय प्रवासाचे मुख्य ध्येय राहिले आहे. त्यांच्या या वाढदिवसाचे औचित्य साधून जळगाव जिल्ह्यातील खासदार, आमदार, माजी लोकप्रतिनिधी आणि विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दिग्गजांनी त्यांच्या कार्याचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रात 'हर घर जल' योजनेच्या माध्यमातून त्यांनी राज्यात केलेले उत्कृष्ट कार्य, महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी बहिणाबाई मार्टची केलेली निर्मिती आणि आरोग्य व्यवस्थेचा केलेला कायापालट या प्रतिक्रियांतून प्रकर्षाने समोर येतो. पक्षाच्या सीमा ओलांडून विरोधकांनाही आपल्या कामाची पावती देण्यास भाग पाडणारे 'खान्देशचे हे बुलंद नेतृत्व' दीर्घायुषी होवो, अशा भावना जिल्ह्यातील राजकीय धुरिणांनी व्यक्त केल्या आहेत, त्यांच्या शुभेच्छा त्यांच्याच शब्दात....

प्रिय गुलाबरावजी,

आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून आपण करीत असलेले कार्य नक्कीच प्रशंसनीय आहे. मनमिळावू स्वभाव, प्रेम, आपुलकी, स्नेह यासोबतच कामातील निष्ठा आणि प्रामाणिकपणा यामुळे जनतेच्या मनात आपण वेगळे स्थान निर्माण केले आहे.

लोकहितार्थ एखादे काम पुर्णत्वास नेण्यासाठीची आपली जिद्द मी पाहिली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून नागरिकांना योग्य व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपले सुरु असलेले काम खरोखरच कौतुकास्पद आहे. विशेषतः ग्रामीण भागात जल जीवन मिशनचे काम झपाट्याने पूर्ण होत आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात स्वच्छ पाणी पुरवठा, स्वच्छता व्यवस्था आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आपण नेहमीच पुढाकार घेतला आहे.

आपल्या माध्यमातून विभागासंबंधी नवनवीन संकल्पना, लोकोपयोगी उपक्रम राबविले जातील. तसेच विभाग अधिक लोकाभिमुख होईल, याची खात्री आहे. आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि जनसेवेची आपली ऊर्जा अखंड अशीच कायम राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

आपणास वाढदिवसाच्या पुनःश्च मनःपूर्वक शुभेच्छा !

(एकनाथ संभाजी शिंदे)

### 'जनसेवेचा व्रत घेतलेला निष्ठावान शिवसैनिक



भाऊंचा सार्वजनिक जीवनाचा प्रवास हा शिवसेनेच्या विचारधारेवर आधारित जनसेवा, संघर्ष आणि तळागाळातील समाजाशी असलेल्या नात्याचे उत्तम उदाहरण आहे.
गुलाबराव पाटील हे केवळ एक लोकप्रिय लोकप्रतिनिधी नाहीत, तर ते एक निष्ठावान शिवसैनिक म्हणूनही ओळखले जातात.
सामान्य कार्यकर्त्यापासून नेतृत्वापर्यंतचा त्यांचा प्रवास हा पक्षनिष्ठा, सातत्यपूर्ण संघर्ष आणि जनतेशी असलेल्या प्रामाणिक बांधिलकीवर आधारित आहे. शिवसेनेच्या विचारधारेनुसार 'जनतेसाठी झटणारा कार्यकर्ता ' ही भूमिका त्यांनी नेहमीच प्रामाणिकपणे पार पाडली आहे. आंदोलनात्मक राजकारणात सक्रिय सहभाग घेत, शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे.

**–श्रीमती रक्षा निखिल खडसे, केंद्रीय राज्यमंत्री**

### गुलाबराव पाटील एक अष्टपैलू व्यक्तीमत्व



पालकमंत्री गुलाबराव पाटील शिवसेना पक्षात असले तरी विकासकामांबाबत त्यांनी कधी पक्षीय भेदभाव केला नाही. सर्वांना सोबत घेवून पुढे जाणारे ते नेतृत्व आहे. पालकमंत्री पदावरुनही त्यांनी जिल्ह्यातील विकासकामांना नेहमीच चालना दिली आहे. त्यांच्याकडे कामे घेवून जाणारे कधीही रिकाम्या हाताने परत येत नाहीत. पक्ष विरहित कामे करणारे नेते म्हणून त्यांचे नाव आहे. नेहमीच विकासाला अधिक महत्व दिले. भुसावळ मतदार संघासाठीही त्यांनी डीपीडीसी व विविध योजनांमधून निधी उपलब्ध करुन दिला. त्यांच्यासोबत गेल्या १५ वर्षांपासून मी काम करीत आहे, त्यांची अनेक स्वभाव वैशिष्ट आहेत. एक अष्टपैलू, अभ्यासू, प्रत्येक प्रश्नांची जाण असलेले तसेच सर्वसामान्यांसोबत नेहमी संपर्कात असलेले नेते म्हणून त्यांची राज्यभरात ओळख आहे. आगामी काळातही ही ओळख कायम राहिल.

**–संजयजी सावकारे, वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य**

### आरोग्य, महिलांच्या उन्नतीसाठी महत्वपूर्ण योगदान



गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री पद भूषवत असतांना जिल्हा रुग्णालय अद्यावत करून गरीब जनतेसाठी अतिशय महत्वाचे काम केले. त्यामुळे रुग्णांची खुप मोठी सोय झाली. पालकमंत्री या नात्याने डीपीडीसीच्या माध्यमातून खूप चांगले काम जिल्ह्यात केले. बहिणाबाई मार्ट सारखी इमारत उभी करून जळगाव जिल्ह्यातील बचत गटाच्या महिलांनी तयार केलेला माल विकण्यासाठी एक नवीन बाजारपेठ महिलांना उपलब्ध करून दिली आहे. पालकमंत्री म्हणून त्यांचे जिल्ह्याला दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. पाणी पुरवठामंत्री असल्याने जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध प्रकारच्या योजना ह्या गावोगावात पोहचविण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत.

**–स्मीता वाघ, खासदार, जळगाव लोकसभा मतदारसंघ**

### राजकारणात ठसा उमटवणारे नेतृत्व



पाळधीसारख्या छोट्या गावातून मंत्रिमंडळापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास करत आपल्या कर्तृत्व, जिद्द आणि जनसेवेच्या बळावर राज्याच्या राजकारणात स्वतंत्र ठसा उमटवणारे मा. गुलाबराव पाटील यांचे प्रभावी नेतृत्व आहे. उच्च पदावर विराजमान असतानाही सर्वसामान्य जनतेशी आपली नाळ कायम जोडून ठेवणे ही त्यांची सर्वात मोठी ओळख आहे. त्यांच्या साधेपणा, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख स्वभावामुळे जनतेने त्यांना प्रेमाने 'गुलाबभाऊ' अशी आपुलकीची ओळख दिली आहे. आपल्या प्रभावी वक्तृत्वामुळे ते केवळ सभा जिंकत नाहीत, तर लोकांची मनेही जिंकतात. सत्तेत असो वा विरोधात, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आक्रमकपणे लढणारा लढवय्या नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. या कार्यामुळे जनतेने त्यांना प्रेमाने 'पाणीवाले बाबा' ही सन्मानाची उपाधी दिली आहे.

**अशोक भवरलाल जैन, चेअरमन, जैन इरिगेशन, जळगाव**

### सच्चा शिवसैनिकाचे मूर्तिमंत उदाहरण



सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत आपल्या कर्तृत्व, जनसंपर्क आणि संघटन कौशल्याच्या बळावर कार्यकर्ता, आमदार, मंत्री आणि पालकमंत्री पदापर्यंत मजल मारणारे ना. गुलाबरावजी पाटील हे कार्यकर्ता कसा असावा आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी निष्ठा राखणारा सच्चा शिवसैनिक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ म्हणून त्यांची राज्यभर वेगळी ओळख निर्माण झाली आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आणि माझ्या मतदारसंघातील विविध विकासकामांसाठीही नेहमीच सकारात्मक सहकार्य केले. जिल्ह्यात भाजपा-शिवसेना महायुती अधिक मजबूत, समन्वयपूर्ण आणि अभेद्य राहावी यासाठी त्यांची भूमिका कायम विधायक व सकारात्मक राहिली आहे.

**–मंगेश चव्हाण, आमदार चाळीसगाव**

### जनतेच्या प्रश्नांची जाण असलेला नेता



सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेवून चालणारा हा नेता आहे, उत्तम संघटन कौशल्य असल्याने कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यात त्यांना यश मिळते. जनतेच्या विविध प्रश्नाची उत्तम जाण आहे. कार्यकर्त्यांसह जनतेसाठी सदैव उपलब्ध असतात. पालकमंत्री या नात्याने आमचे अनेक प्रश्न आम्ही त्यांच्यापुढे मांडतो, व ते सोडवितातही. आपल्याकडे आलेल्या प्रत्येकाची समस्या जाणून घेवून ती परिपूर्णपणे सोडविण्याची हातोटी ही आम्हालाही प्रेरणा देणारी ठरते. विधानसभेतही त्यांची आक्रमक शैली जिल्ह्याचे नाव उंचविणारी ठरते. यामुळे अनेक प्रश्न समोर येतात. सर्वसामान्यांना घेवून चालणारा हा प्रेमळ माणूस जिल्ह्यातील सर्व जनतेला भावलेला माणूस आहे.
त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**– सुरेश भोळे, आमदार जळगाव**

### वरिष्ठ नेत्यांचे स्वप्न साकारणारा नेता



शिवसेनेचे मुख्यनेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधून केवळ १२ आमदारांना मंत्रिमंडळात स्थान दिले. या मिळालेल्या अत्यंत महत्त्वाच्या मंत्रिपदाचा नामदार गुलाबराव पाटील यांनी आपल्या अष्टपैलू कार्याने नेहमीच सन्मान राखला आहे. त्यांच्या कार्यकाळात जलजीवन मिशन अंतर्गत राज्यभरात 'हर घर जल' ही महत्त्वाकांक्षी पेयजल योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. या योजनेमुळे राज्यातील प्रत्येक गरजू कुटुंबाला आणि घराघरात शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर सोपवलेली ही मोठी जबाबदारी त्यांनी अत्यंत योग्यरीत्या पार पाडली आहे. नामदार गुलाबराव पाटील यांच्या हातून अशीच लोकसेवा अविरतपणे होत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

**–किशोर पाटील, आमदार पाचोरा**

### शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावे



मंत्री गुलाबराव पाटील यांनी आतापर्यंत शासनाच्या विविध महत्त्वाच्या विभागांची मंत्रीपदे अत्यंत कार्यक्षमतेने आणि चांगल्या प्रकारे भूषवली आहेत. त्यांना आमच्यासोबत काम करण्याचा दीर्घ अनुभव असून, त्यांचे कार्य नेहमीच कौतुकास्पद राहिले आहे. सध्या त्यांच्याकडे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची मोठी जबाबदारी आहे. या पदाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील जनतेसाठी पिण्याच्या पाण्याच्या उत्कृष्ट योजना उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा आहे. तसेच जलसंधारणाच्या विविध उपक्रमांतून त्यांनी राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवावेत, हीच सदिच्छा आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना भावी वाटचालीसाठी उत्तमोत्तम यश मिळो, त्यांचे आरोग्य नेहमी उत्तम लाभो आणि दीर्घायुष्य लाभो.

**– एकनाथराव खडसे, आमदार विधानपरिषद**

### जनसेवेचे कार्य अधिकाधिक बळकट व्हावे



आदरणीय गुलाबभाऊ आणि स्वर्गीय हरीभाऊ यांच्यामध्ये अत्यंत अतूट स्नेहाचे, जिव्हाळ्याचे आणि कौटुंबिक नाते होते. त्या पवित्र नात्यातील निखळ प्रेम, आपुलकी आणि दृढ विश्वास गुलाबभाऊंनी आजही तितक्याच आदराने मनापासून जपला आहे. त्यांनी नेहमीच माझ्यावर स्वतःच्या मुलाप्रमाणे भरभरून प्रेम केले असून, त्यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि खंबीर आशीर्वाद माझ्या पाठीशी नेहमीच कायम राहिले आहेत. त्यांचा हा मायेचा हात माझ्यावर सदैव असाच राहावा, हीच सदिच्छा आहे. आदरणीय गुलाबभाऊंना ईश्वराने उत्तम आरोग्य, निरोगी आणि दीर्घायुषी जीवन प्रदान करावे, तसेच दीनदुबळ्यांची व सर्वसामान्यांची जनसेवा करण्याचे त्यांचे हे पवित्र कार्य आगामी काळात अधिकाधिक बळकट होत राहो.

**– अमोल जावळे, रावेर विधानसभा**

### आक्रमकतेला विधायकतेची जोड



वक्तृत्वात शब्दांना खूप महत्त्व असते. 'शब्द दवा आहे, शब्द दुवा आहे आणि शब्द आपल्या जीवनाचा ठेवा आहे.' शब्दांच्या माध्यमातून माणसांची मनं जिंकणे हे राजकारणात अत्यंत महत्त्वाचे असते आणि ही कला गुलाबभाऊंनी अवगत केलेली आहे. एखाद्या विषयावर सर्वजण बोलतात; पण दुसऱ्याच्या हृदयापर्यंत पोहोचणे ही बाब गुलाब भाऊंनी साध्य केली आहे. माझा आणि गुलाबभाऊंचा परिचय जवळपास तीस वर्षांपासूनचा आहे. मी विधानसभा अध्यक्ष असताना ते विरोधी पक्षाचे आमदार होते. त्यांच्या स्वभावात आक्रमकता आहे आणि राजकारणात काही प्रमाणात आक्रमकता गरजेचीही असते. मात्र सध्याच्या राजकारणात आक्रमकता वाढत असताना सकारात्मकता कमी होताना दिसते. गुलाबभाऊंच्या आक्रमकतेला विधायकतेची झालर लाभलेली आहे.

**– अरूणभाई गुजराथी, माजी विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य**

### प्रश्न प्रभावीपणे मांडण्याची हातोटी



जळगाव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सतत अहोरात्र प्रयत्नशील राहणारे आणि सामान्य माणसाशी नेहमी थेट संपर्क ठेवणारे नेतृत्व म्हणून गुलाबभाऊ परिचित आहेत. जनतेच्या प्रत्येक सुख-दुःखात हिरीरीने सहभागी होणारे व प्रसंगी समाजासाठी रोखठोक भूमिका घेणारे नेते म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. जिल्ह्याचे प्रलंबित आणि महत्त्वाचे प्रश्न विधिमंडळाच्या सभागृहात अत्यंत प्रभावीपणे मांडण्याची त्यांची अनोखी हातोटी नेहमीच राजकारणात दखलनीय ठरली आहे. आदरणीय गुलाबभाऊंनी जनहितार्थ हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात त्यांना मोठे यश मिळो, याचबरोबर जिल्ह्याच्या प्रगतीचे काम त्यांच्या हातून घडो, हीच सदिच्छा. या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना करतो

**– शिरीष चौधरी, माजी आमदार रावेर**

### काळा काळातील शिवसैनिकांना न्याय देणारा नेता



जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गुलाबराव पाटील ( भाऊ ) हे सर्वसामान्य जनतेला न्याय देणारे एक अत्यंत खंबीर आणि अद्वितीय नेतृत्व आहेत. त्यांचे संघटन कौशल्य अतिशय मजबूत असून, सर्व सहकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना प्रेमाने एकत्र टिकवून ठेवण्याची अफाट क्षमता त्यांच्यामध्ये आहे. यासोबतच, जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आवश्यक असणारी त्यांची विकासात्मक दूरदृष्टी खरोखरच वाखाण्याजोगी आहे. गेल्या पंधरा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी आपल्या धडाडीच्या कामगिरीने मतदारसंघासह संपूर्ण जळगाव जिल्ह्याला राज्यात एक नवी आणि सक्षम ओळख मिळवून दिली आहे. त्यांच्या या निरंतर चालणाऱ्या लोककल्याणकारी आणि जनविकासाच्या कार्यासाठी त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांच्या हातून जिल्ह्याचा असाच विकास व्हावा, हीच मनःपूर्वक सदिच्छा व्यक्त करतो.

**–दिलीप वाघ, माजी आमदार, पाचोरा**

### राज्यात पाणीपुरवठ्याचे उत्कृष्ट काम



माननीय गुलाबराव पाटील यांनी पाणीपुरवठा व पालकमंत्री पदाची धुरा सांभाळल्यापासून जळगाव जिल्ह्याला सुजलाम सुफलाम बनवण्याचा दृढ संकल्प केला आहे. जिल्ह्यातील गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी ते रात्रंदिवस झटत आहेत. ग्रामपंचायत सदस्य आणि नगरसेवकांना सोबत घेऊन, प्रत्येकाशी मिळूनमिसळून काम करणारे ते एक जननेते आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजावर त्यांचे बारकाईने लक्ष असते, ज्यामुळे विकासकामांना मोठी गती मिळते. तळागाळातील आणि सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून आज त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा विभागाने राज्यभरात अत्यंत उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरी केली असून, या दूरगामी जलकार्याचा मोठा फायदा भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांना नक्कीच होणार आहे.

**– शिरीष चौधरी,माजी आमदार अमळनेर**

### गुलाबराव म्हणजे खान्देशचा बुलंद आवाज



पालकमंत्री गुलाबराव पाटील हे शिवसेनेचे दमदार व्यक्तीमत्व आहेत. खान्देशचा बुलंद आवाज म्हणून त्यांची ओळख राज्यभरात आहे, त्यांचा एक मित्र व सहकारी म्हणून आम्हाला निश्चितच गर्व वाटतो. मी १९९५ ला प्रथम आमदार झालो. ते २००० च्या निवडणूकीत प्रथम विजयी झाले. २००४ पर्यंत आम्ही विधानसभेत सोबत काम केले. आमदार निवासमध्येही चार वर्ष नेहमी सोबत राहण्याचा योग आला. त्यांचे काम आम्ही खुप जवळून पाहिले आहे. पक्ष व जातीपातीचे राजकारण न करता सर्व समाजाचा विकास व्हावा, या दृष्टीने त्यांनी काम केले आहे. शिवसेनचा एक सच्चा, प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे, ती नक्कीच पुढेही राहिल. कारण ते तळागाळाशी जोडले गेलेले नेते आहेत.

**–दिलीप भोळे, शिवसेना माजी आमदार, भुसावळ**

### राजकीय वारसा नसतांना स्वकर्तुत्वाने उभा राहिलेला नेता



खानदेशाच्या पवित्र भूमीत आणि जळगाव जिल्ह्यात दोडे गुर्जर समाजाला विशेष मानाचे स्थान आहे. जळगाव जिल्हा हा दोडे गुर्जर समाजाची राजधानी म्हणून ओळखला जातो. अशा समाजातून राज्याच्या राजकारणात प्रभावी नेतृत्व उभे राहणे ही आमच्यासाठी अभिमानाची आणि भाग्याची बाब आहे. त्यांनी सतत पक्षसंघटनेसाठी अथक परिश्रम घेतले. अनेक संकटे, संघर्ष आणि अडचणींचा सामना करत त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. आज राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून तसेच जळगाव जिल्ह्याचे दीर्घकाळ पालकमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. त्यांच्या या यशाकडे पाहताना अनेकदा मन अभिमानाने भरून येते.

**– चंद्रशेखर पाटील, अध्यक्ष, दोडे गुर्जर संस्थान**

### पितृतुल्य व्यक्तीमत्वाने घडविला जिल्ह्याचा विकास



नामदार गुलाबराव पाटील माझ्यासाठी पितृतुल्य व्यक्तिमत्व, भाऊ, मी राजकारणात येण्या अगोदरच माझ्या वडिलांचे मार्गदर्शन घेत असत. भाऊंचा सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा स्वभाव हा माझ्यासाठी पितृतुल्य व्यक्तिमत्व आहे. त्यांनी जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याचे ध्येय ठेवत नेहमीच त्यादृष्टीने प्रयत्न केले आहेत. यामुळे खरोखरच जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली आहे . आमचे काका गुलाबराव पाटील यांची दिवसेंदिवस अशीच प्रगती होत राहो, व त्यांना अधिक जनसेवा करण्याची संधी मिळो हीच प्रार्थना त्यांच्या वाढदिवसानिमित्त करीत आहे.

**–वैशाली सूर्यवंशी, भाजपा नेत्या पाचोरा**

### शतकातील सर्वांना भावणारा नेता



गुलाबराव पाटील व माझी १९९२ पासूनची मैत्री आहे, ती आजवर कायम आहे. या दरम्यान राजकारणात असताना दोन वेळा विधानसभेच्या निवडणुकीत त्यांच्या विरोधात प्रचार केला, मात्र आमच्या मैत्रीत अंतर पडले नाही. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांविषयी त्यांना उत्तम जाण असून त्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात. शब्दांच्या माध्यमातून माणसांची मने जिंकणे हे राजकारणात महत्वाचे असते. ते भाऊ शिताफीने करतात. जिल्ह्याचे महत्वाचे प्रश्नही त्यांनी अनेकदा मांडले आहेत, आपल्या तालुक्यातील जनतेची कामे होवून त्यांना विकासात्मक सेवा सुविधा मिळाव्यात,यासाठी त्यांचे प्रयत्न दिसून येतात. या शतकातील सर्वांना भावणारा हा नेता आहे. त्यांना प्रेमपूर्वक शुभेच्छा.

**– संजय पवार, अध्यक्ष जिल्हा बँक जळगाव**

### वंचित, शोषित कष्टकऱ्यांचे नेते



भाऊनी जळगाव ग्रामीण भागात मागासवर्गीय बांधवांना ४६ बुद्धविहार देवून समाजाप्रती आपुलकीची भावना जोपासली, जिल्हा आदिवासी समाजाला ६५ भगवान एकलव्यांचे पुतळे बसवून दिले. गोरगरिबांच्या कष्टकरी समाज बांधवासाठी धावून जाणारे, प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होणारे यासह सामान्य माणसाच्या आरोग्याची काळजी घेणारे भाऊ आमचे मोठे आधारस्तंभ आहेत. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला जनरल गटातून सभापदी पदावर बसवून कार्यकर्त्यातील गुण ओळखण्याची क्षमता भाऊंमध्ये मोठ्या क्षमतेने आहे. सर्वांना सोबत घेवून चालणारे भाऊ तुम्ही संपूर्ण महाराष्ट्राचे नेतृत्व करावे अशी आमची भावना आहे.

**– मुकुंदराव शामराव नन्नवरे, माजी सभापती, धरणगाव, जिल्हाप्रमुख शिवसेना मागासवर्गीय सेना**

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
। शनिवार, दि. ६ जून २०२६ ।



# लोकनेता



गुलाबराव पाटील वाढदिवस विशेषांक!



### १० हजारांवर भाविकांची मांदियाळी असणारा कीर्तन महोत्सव, यंदा ४ हजार भाविकांना मोफत पंढरीची वारी

# राजकारणात अध्यात्माचा 'गुलाब'... नामदार गुलाबराव पाटलांनी घडविला भक्तीचा अभूतपूर्व सोहळा



श्री क्षेत्र पंढरपूर येथे रवाना होते वेळी भजन संगीतात रममाण झालेले गुलाबरावजी पाटील व भाविक

**'तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे, येरागबाळाचे काम नोहे...' संत तुकाराम महाराजांच्या या उक्तीप्रमाणे वारकरी संप्रदायाचा प्रसार, संवर्धन आणि जनसेवा करणे हे केवळ एक राजकीय कर्तव्य म्हणून नाही, तर अंतःकरणातील अढळ श्रद्धेतून साध्य होते. जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी राजकारणात वावरताना राजकीय अधिष्ठानापेक्षा धार्मिक आणि आध्यात्मिक अधिष्ठानाला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले आहे. 'माणसात देव शोधणारा आणि माणुसकी हाच खरा धर्म मानणारा' वारकरी संप्रदायाचा मूळ विचार त्यांनी आपल्या कार्यातून आणि 'जीपीएस' (गुलाबराव पाटील समर्थक) मित्र परिवाराच्या माध्यमातून तळागाळापर्यंत पोहोचवला आहे. जळगाव जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यापासून ते दरवर्षी हजारो भाविकांना पंढरीची वारी घडवून आणण्यापर्यंत, गुलाबराव पाटील यांनी समाजकारणात भक्तीचा एक नवा आणि आदर्श पॅटर्न निर्माण केला आहे.**



### ७ कोटींच्या खर्चातून साकारतेय ऐतिहासिक 'वारकरी भवन

जळगाव जिल्ह्यात येणाऱ्या विविध भागांतील भाविकांची, कीर्तनकारांची निवासाची सोय व्हावी आणि धार्मिक उपक्रमांना हक्काची जागा मिळावी, या उद्देशाने शहराच्या मध्यवर्ती भागात तब्बल ७ कोटी रुपये खर्चातून भव्य 'वारकरी भवन' उभारण्यात येत आहे. या भवनाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून पुढील दोन महिन्यांत ते वारकऱ्यांच्या सेवेत रुजू होणार आहे. केवळ जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील हे अशा प्रकारचे एकमेव अद्वितीय वारकरी भवन ठरत असल्याने वारकरी संप्रदायामध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण आहे.

### या वैशिष्ट्यांनी वाढणार वारकरी भवनाची ओळख

**शैक्षणिक व निवास व्यवस्था :** वारकऱ्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आणि निवासासाठी भवनात विशेष व्यवस्था करण्यात आली असून, यात १५ ते १६ सुसज्ज खोल्यांची बांधणी करण्यात आली आहे.

**वातानुकूलित सभागृह :** जिल्ह्यासह राज्यातील कीर्तनकारांना धार्मिक उपक्रमा दरम्यान राहण्याची उत्तम सोय असून, ३०० पेक्षा अधिक भाविक बसू शकतील असे भव्य वातानुकूलित (AC) सभागृह येथे तयार केले आहे.

**भव्य डोम :** मुख्य इमारतीसमोर एक प्रशस्त डोम उभारला जाणार आहे, जिथे मोठे धार्मिक सोहळे संपन्न होऊ शकतील.

**१५ प्रख्यात कीर्तनकारांचे विश्वस्त मंडळ :** भवनाचे कामकाज अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध चालावे यासाठी 'गुरुमोठेबाबा सेवा ट्रस्ट' अंतर्गत १५ नामांकित कीर्तनकारांचे एक विश्वस्त मंडळ स्थापन केले जात आहे. यामध्ये अध्यक्ष गजानन महाराज वरसाडेकर, समाधान महाराज कोळेकर, ज्ञानेश्वर महाराज पाळधीकर, सी.एस. पाटील धरणगावकर, पांडुरंग महाराज आवारकर, गोविंद महाराज केकत निभोरेकर, कैलास महाराज चोपडेकर, जयगोपाल शास्त्री आडगावकर, अंकुश महाराज मनवेलकर, राजेंद्र महाराज पिंपळकोळेकर, रवींद्र महाराज मुक्ताईनगरकर, सुशील महाराज विटनेरकर, शाम महाराज पिंपळगावकर, विठ्ठल महाराज आडगावकर आणि प्रतिभाताई यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी संप्रदायाची ही पवित्र परंपरा अखंड राखली जाणार आहे.

### 'भक्तीचा मळा राखणारा लोकनेता'

हातात घेऊन टाळ-मृदंग, ज्यांनी जागवला भक्तीचा रंग,
जळगावच्या मातीत भाऊ, तुमच्या कार्याने जन दंग...
७ कोटींचे वारकरी भवन, संतांच्या चरणी केले अर्पण,
पाळधी ते पंढरपूर घडविले, हजारो वृद्धांना विठ्ठल दर्शन...
कीर्तनाची वाहिली गंगा, दारी नटली भक्तांची मांदियाळी,
अंधाराच्या आयुष्यात तुम्ही, प्रकाशाची आणली दिवाळी...
राखून गावची एकसंघता, जपला तुम्ही माणुसकीचा धर्म,
गुलाबराव भाऊ तुमचे हेच, ठरले श्रेष्ठ आरोग्याचे आणि भक्तीचे कर्म...

**पंढरपूरची वारी ठरतेय विठ्ठल भक्तांसाठी माहेरची सोय ; यंदा ४ हजार भाविक जाणार पंढरीला :-** दरवर्षी आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या सर्वसामान्य वारकऱ्यांसाठी मंत्री गुलाबराव पाटील यांनी विशेष आणि सोयी-सुविधांनी युक्त



अशी व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. यात भाविकांच्या प्रवासासह भोजन, निवासाची चोख व्यवस्था केली जाणार आहे. 'हजारो भाविकांना पंढरपूरच्या वारीसाठी विठ्ठल दर्शनाला पाठवण्याचे भाग्य आपल्याला लाभले, हेच माझ्या आयुष्याचे सार्थक आहे,' अशी कृतज्ञ भावना 'भाऊ' नेहमी व्यक्त करतात.

'जीपीएस मित्र परिवारा'च्या माध्यमातून सुरू असलेल्या या पंढरपूर यात्रेचे नियोजन दरवर्षी अधिक व्यापक होत चालले आहे. पहिले वर्ष : ३ हजारांवर भाविकांना मोफत पंढरपूर यात्रा घडवली. दुसरे वर्ष: दुसऱ्या वर्षीही हीच परंपरा कायम ठेवत ३ हजारांवर भाविक पंढरीला गेले.

**तिसरे वर्ष (चालू वर्ष):** यंदा २७ जून रोजी तब्बल ४ हजारांवर भाविकांना पंढरपूर यात्रेला नेण्याचे अत्यंत सूक्ष्म आणि चोख नियोजन करण्यात आले आहे.

### पाळधी गावातील कीर्तन महोत्सव भक्ती आणि भोजनाची अनोखी मांदियाळी

पाळधी गावामध्ये दरवर्षी मे महिन्याच्या अखेरीस मंत्री गुलाबराव पाटील यांच्या जन्मदिनानिमित्त गेल्या चार वर्षांपासून एका भव्य 'कीर्तन महोत्सवा'चे आयोजन केले जाते. सुरुवातीला ३ हजार भाविकांच्या उपस्थितीने सुरू झालेल्या या सोहळ्याचे स्वरूप आता १० हजारांपेक्षा अधिक भाविकांच्या जनसागरात झाले आहे. सप्ताहभराच्या या धार्मिक उत्सवात महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकारांची कीर्तने, भारुडे आणि काल्याच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर विठ्ठलमय होऊन जातो. अबालवृद्ध, महिला व पुरुष भजनात तल्लीन होऊन नाचतात. या महोत्सवात येणाऱ्या



हजारो भाविकांसाठी २४ तास शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चहा, नाश्ता आणि उत्कृष्ट भोजनाची पंगत ठेवली जाते, ज्यामुळे हा सोहळा संपूर्ण तालुक्यासाठी एक आनंदपर्वणी ठरतो. यंदाच्या काल्याच्या कीर्तनाला तब्बल ७० प्रख्यात कीर्तनकारांची उपस्थिती हे या सोहळ्याच्या लोकप्रियतेचे आणि 'भाऊंच्या' आदराचे जिवंत उदाहरण आहे.

### गावागावांत टाळ-मृदंगाचा गजर आणि बालकांना वारकरी शिक्षण

ग्रामीण भागातील भजनी मंडळांचे अस्तित्व टिकून राहावे आणि तरुणांमध्ये अध्यात्माची गोडी निर्माण व्हावी, यासाठी नामदार गुलाबराव पाटील यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. गावागावांतील भजनी मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी टाळ, मृदंग आणि इतर दर्जेदार भजन साहित्याचे मोफत वाटप केले आहे. याशिवाय, धरणगाव येथील 'वारकरी बहुउद्देशीय संस्थेला' मोठ्या प्रमाणावर आर्थिक व इतर सहाय्य पुरवून त्यांनी लहान बालकांना वारकरी शिक्षण, संस्कार आणि प्रबोधनाचे धडे देण्याच्या कार्यास भक्कम बळ दिले आहे.

### 'जीपीएस' परिवारातर्फे धार्मिक एकसंघता आणि महिलांच्या आरोग्याची काळजी

पाळधी गावाची धार्मिक आणि सामाजिक एकसंघता कायम राखण्यासाठी 'जीपीएस' मित्र परिवारातर्फे दरवर्षी गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव (नवरात्रोत्सव) अत्यंत अपूर्व उत्साहात साजरे केले जातात. तरुणांचा आणि भाविकांचा उत्साह वाढवण्यासाठी या उत्सवा दरम्यान विविध सांस्कृतिक आणि कौटुंबिक स्पर्धांचे आयोजन केले जाते. यामध्ये सहभागी होणाऱ्या व विजेत्यांना वॉशिंग मशीन, फ्रीज यांसारखी लाखो रुपयांची घरगुती उपयोगाची बक्षिसे देऊन गौरविले जाते.

### महिला 'जीपीएस' ग्रुप आणि मोफत आरोग्य तपासणी

महिलांनाही सण-उत्सवांमध्ये हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी 'महिला जीपीएस ग्रुप'ची स्थापना करण्यात आली आहे. केवळ मनोरंजनावर भर न देता, सामाजिक भान राखत महिलांमध्ये वाढणारे स्तन कॅन्सरचे प्रमाण लक्षात घेऊन, या गंभीर आजाराची संपूर्ण मोफत तपासणी व निदान शिबिराचे नियोजन 'जीपीएस' ग्रुपने केले आहे. यामुळे या धार्मिक चळवळीला आता आरोग्याची संवेदनशील जोड मिळाली आहे.

### माणुसकीचा धर्म जपणारा लोकनेता

सत्ता आणि संपत्तीच्या पलीकडे जाऊन जेव्हा एखादा नेता संतांच्या विचारांना आपल्या जगण्याचा आणि राजकारणाचा आधार बनवतो, तेव्हा गुलाबराव पाटील यांच्यासारखे 'आरोग्यदूत' आणि 'भक्तीदूत' नेतृत्व आकारास येते. सत्य, सदाचार आणि प्रबोधनाचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असणारे 'भाऊ' जळगाव जिल्ह्याच्या आध्यात्मिक वैभवात मोलाची भर घालत आहेत, हेच या सर्व कार्यातून अधोरेखित होते.

### 30 हजारांहून अधिक नागरिकांची नेत्रतपासणी, पाळधी ते पनवेल 'फाइव्ह स्टार' सेवा; जळगावकरांसाठी मोफत 'आरोग्य रथ'

# 'गुलाबभाऊं'ची प्रकाशयात्रा... १५ हजार ज्येष्ठांच्या आयुष्यात आणली प्रकाशाची नवी पहाट

**राजकारणाचा मुख्य उद्देश समाजकारण आणि जनसेवा हाच असतो, हे जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. मतदारसंघातील विकासकामांचा डोंगर उभा करत असतानाच, त्यांनी जनतेच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आपल्या मतदारसंघातील शेकडो-हजारो ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांतील अंधार दूर करून त्यांच्या आयुष्यात प्रकाशाची नवी पहाट आणणारा एक अत्यंत स्तुत्य आणि कौतुकास्पद उपक्रम मंत्री गुलाबराव पाटील यांनी राबवला आहे. 'जीपीएस मित्र मंडळा'च्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या मोफत नेत्ररोग तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांनी आज व्यापक रूप घेतले असून, ते हजारो कुटुंबांसाठी संकटमोचक ठरले आहे.**



### अंधाराकडून प्रकाशाकडे: १५ हजारांवर यशस्वी शस्त्रक्रिया

वयाच्या एका टप्प्यावर आल्यानंतर अनेक ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदू किंवा इतर नेत्रविकारांमुळे अंधुक दिसू लागते. गरिबी किंवा कौटुंबिक अडचणींमुळे अनेक जण या आजाराकडे दुर्लक्ष करतात. हीच अडचण ओळखून नामदार गुलाबराव पाटील यांनी आपल्या मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मोफत नेत्ररोग तपासणी व मोफत शस्त्रक्रिया' अभियान सुरू केले. केवळ नावापुरते शिबिर न घेता, अत्यंत नियोजनबद्ध रीतीने आजवर तब्बल ३० हजारांपेक्षा अधिक नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. यातील गरजू रुग्णांना शोधून तब्बल १५ हजाराहून अधिक ज्येष्ठ नागरिकांवर अत्यंत यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना नवी दृष्टी बहाल करण्यात आली आहे. आपल्याच लोकप्रतिनिधीने घेतलेल्या या काळजीमुळे अनेक ज्येष्ठांना पुन्हा एकदा हे सुंदर जग पाहता आले आहे.

### आंतरराष्ट्रीय दर्जाच्या रुग्णालयात उपचार

या अभियानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे रुग्णांवर होणारे उपचार हे कोणत्याही स्थानिक किंवा सामान्य रुग्णालयात न करता, पनवेल येथील अत्याधुनिक अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या रुग्णालयात केले जातात. ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णाला एवढ्या मोठ्या शहरात जाऊन उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसते. परंतु, मंत्री गुलाबराव पाटील यांनी रुग्णांच्या प्रवासाची, राहण्याची आणि उपचाराची संपूर्ण जबाबदारी स्वतः उचलली आहे. रुग्णांना पनवेल येथे ने-आण करण्यासाठी विशेष स्वतंत्र वातानुकूलित ट्रॅव्हल्स बसेसची व्यवस्था पूर्णपणे मोफत करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, वयोवृद्ध रुग्णांसोबत त्यांच्या काळजीसाठी येणाऱ्या एका नातेवाइकाला (अटेंडंट) देखील ही सर्व आलिशान प्रवासाची सुविधा मोफत दिली जाते.

### आदरातिथ्य आणि घरगुती काळजी: जणू माहेरची सोय :-

शस्त्रक्रियेच्या काळात पनवेल येथे रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाइकांची काळजी एखाद्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे घेतली जाते. मुक्कामाच्या दरम्यान दररोज उत्कृष्ट दर्जाचे जेवण, चहा आणि नाश्त्याची उत्तम सोय केली जाते. रुग्णांना घराची उणीव भासू नये, याची पुरेपूर दक्षता घेतली जाते. याच उत्तम व्यवस्थेमुळे आणि आपुलकीच्या वातावरणामुळे ज्येष्ठ रुग्णांचा इतर कोणत्याही रुग्णालयापेक्षा 'जीपीएस मित्र मंडळातर्फे' आयोजित शिबिरातच शस्त्रक्रिया करण्यावर सर्वाधिक भर असतो. हे शिबिर म्हणजे उपचाराचे केंद्र नसून ती एक हक्काची माउलीची सावली बनली आहे. कार्यकर्त्यांची स्वयंस्फूर्त फळी : घरातून नेण्यापासून ते सुरक्षित सोडण्यापर्यंत :- कोणतीही मोठी चळवळ कार्यकर्त्यांच्या निष्ठेशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. गुलाबराव पाटील यांच्या या कार्यात त्यांच्या कार्यकर्त्यांची एक स्वतंत्र, शिस्तबद्ध आणि समर्पित यंत्रणा २४ तास कार्यरत आहे. हे कार्यकर्ते कोणत्याही मानधनाशिवाय, केवळ समाजसेवेच्या भावनेने स्वयंस्फूर्तीने काम करतात. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या घरातून आदराने गाडीपर्यंत आणणे, प्रवासात त्यांची काळजी घेणे, रुग्णालयात डॉक्टरांच्या मदतीने सर्व प्रक्रिया पार पाडणे आणि शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर त्यांना पुन्हा सुरक्षितपणे त्यांच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचवणे, हे सर्व काम हे कार्यकर्ते अत्यंत उत्साहाने आणि माणुसकीच्या नात्याने करतात. कार्यकर्त्यांचा हा जिव्हाळा रुग्णांचे मनोबल वाढवणारा ठरत आहे.





### उपचारासाठी पुरेपूर प्रयत्न :-

केवळ नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया न करता तालुक्यातील विविध आजारांनी रुग्णांना शक्य ती आर्थीक मदत करण्या बरोबरच त्या रुग्णांना मोफत उपचारासाठी मुंबई, पुणे मधील मोठ्या नामांकित हॉस्पिटलातही उपचार सेवा मिळवून देण्याकामी गुलाबराव पाटील यांचा मोलाचा पुढाकार. आजाराने ग्रस्त रुग्णांना केवळ मार्गदर्शन न करता, रुग्णाच्या सोबत आपले विश्वासू कार्यकर्ते पाठवून रुग्णांच्या उपचाराची पुरेपूर सुविधा मिळे पर्यंतचे प्रयत्न व उपचारानंतरही पाठपुरावा करण्याचे कार्यही उत्तमप्रकारे केले जाते, यामुळे आपला हक्काचा ' माणूस ' आरोग्यक्षेत्रात उपलब्ध असल्याचा अभिमान तालुक्यातील नागरिकांना वाटतो.

रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून 'जीवनदान' :- गुलाबरावजी पाटील यांचे आरोग्यविषयक कार्य केवळ डोळ्यांच्या शस्त्रक्रियेपुरते मर्यादित नाही. पाळधी गावात त्यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने आणि नियमितपणे भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा भासू नये आणि वेळेवर रुग्णांना रक्त मिळून त्यांचे प्राण वाचावेत, यासाठी हे अभियान चालवले जाते. या नियमित रक्तदान चळवळीच्या माध्यमातून आजवर हजारावर रक्तबाटल्यांचे संकलन करण्यात आले आहे. हे रक्त अनेक गंभीर रुग्णांसाठी जीवनदायी ठरले असून,



रक्तदानाच्या या मोलाच्या योगदानामुळे परिसरातील आरोग्य यंत्रणेला खूप मोठा आधार मिळाला आहे.

### एक संवेदनशील लोकनेता :-

राजकारणात रस्ते, पाणी, वीज या भौतिक विकासाला महत्त्व असतेच, पण त्याहूनही अधिक महत्त्व माणसाचे अश्रू पुसण्याला असते. जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या मतदारसंघात राबवलेले हे आरोग्य कार्य त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देते. स्वतःच्या मतदारसंघातील ज्येष्ठांना आई-वडिलांचे स्थान देऊन त्यांच्या डोळ्यांत प्रकाशाचे दीप लावणारा हा 'आरोग्यदूत' खऱ्या अर्थाने जनमानसात आदराचे स्थान मिळवून गेला आहे. त्यांच्या या आरोग्याधिष्ठित समाजकार्याला संपूर्ण जळगाव जिल्ह्यातून आणि विशेषतः लाखो माता-भगिनींकडून दुवा आणि आशीर्वाद मिळत आहेत.

• शब्दांकन - योगेश वाणी, • संकलन- मुकुंदराव नन्नवरे

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा विक्रमी वर्षाव

# लोकप्रेमाचा महासागर उसळला!

## सुमारे दहा तास शुभेच्छा स्वीकारल्या; हजारो कार्यकर्त्यांच्या प्रेमाने पाळधी भगवामय

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/धरणगाव जळगाव| प्रतिनिधी:** राजकारणात अनेक नेते असतात, पण जनतेच्या हृदयावर राज्य करणारे नेते फार थोडे असतात. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री आणि शिवसेनेची मुलुखमैदान तोफ गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज पाळधी येथे लोकप्रेमाचा अक्षरशः महासागर उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. जी.पी.एस. कॅम्पस हायस्कूलसमोरील विशाल पटांगणावर सकाळी साडेसात वाजल्यापासूनच शुभेच्छुकांच्या रांगा लागण्यास सुरुवात झाली. दुपार, संध्याकाळ आणि रात्रीपर्यंत सुरू राहिलेल्या या अभिष्टचिंतन सोहळ्यात तब्बल पाच हजारांहून अधिक मान्यवर, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे सलग दहा तास गुलाबभाऊंनी प्रत्येक शुभेच्छुकाला हसतमुखाने भेटत शुभेच्छा स्वीकारल्या.

**हार-तुऱ्यांऐवजी ज्ञानदानाचा अभिनव उपक्रम**

मंत्री गुलाबराव पाटील यांच्या सामाजिक विचारांची प्रचिती यंदाच्या वाढदिवसालाही आली. हार, फुले आणि दिखाऊ भेटवस्तूंना फाटा देत हजारो शुभेच्छुकांनी ३० हजारांहून अधिक वह्या, शैक्षणिक साहित्य आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त वस्तू भेट देऊन वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली.

**वाढदिवस आणि पर्यावरण दिनाचा सुंदर संगम**

आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक शुभेच्छुकाला एक झाड देण्यात आले. "एक झाड... भावी पिढ्यांसाठी जीवनाचा श्वास!" हा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. याचवेळी पाळधी परिसरात भव्य 'ऑक्सिजन पार्क' उभारण्या त येणार असून त्याची पूर्ण तयारी करण्यात आली आहे.. बारा ते पंधरा फूट उंचीची मोठी झाडे लावून भविष्यात हा परिसर हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात आला.

**दिव्यांग बांधवांना तीन चाकी सायकलींचे वाटप**

वाढदिवसाच्या निमित्ताने समाजहिताचे अनेक उपक्रम राबविण्यात आले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते दिव्यांग बांधवांना तीन चाकी सायकलींचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. *पुणेरी पगडी, राजस्थानी साफा आणि वारकरी वेशातून सन्मान शुभेच्छुकांनी गुलाबभाऊंवर प्रेमाचा वर्षाव करत विविध पारंपरिक पद्धतींनी त्यांचा सत्कार केला. कुणी पुणेरी पगडी बांधली, कुणी राजस्थानी साफा चढविला, तर कुणी वारकरी वेश, शाल, श्रीफळ, फेटे आणि गांधी टोपी देऊन सन्मान केला.



### विश्वास, प्रेम आणि नात्यांचा उत्सव

राजकीय शक्तीने गर्दी जमवता येते; पण जनतेच्या मनातील प्रेम विकत घेता येत नाही. पाळधीच्या मैदानावर उसळलेली ही गर्दी कोणत्याही राजकीय समीकरणाची नव्हे, तर जनतेच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासाची, आत्मीयतेची आणि प्रेमाची साक्ष होती. पण जनतेच्या मनात गुलाबभाऊंबद्दल फुललेलं प्रेम कायम ताजंच राहील! शिवसैनिकांसाठी दसरा मेळावा जसा उत्सव असतो, पाळधीतील गुलाबभाऊंचा वाढदिवस हा जनतेच्या प्रेमाचा आणि निष्ठेचा महोत्सव ठरला आहे.

**लढवय्या नेतृत्वाचा गौरव केला**

**भगवामय झाला पाळधीचा परिसर**

सभास्थळ परिसर पूर्णपणे भगवामय झाला होता. सर्वत्र भगवे झेंडे, आकर्षक बॅनर्स, घोषणांचा गजर आणि शिवसैनिकांचा उत्साह पाहून दसरा मेळाव्याची आठवण होत होती. लोकशाहीर सखाराम जोशी प्रतिष्ठानचे शाहीर संग्राम जोशी व त्यांच्या टीमने गुलाबभाऊ अभिष्टचिंतन दमदार पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि गगनभेदी घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

**राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव**

उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, शिक्षण मंत्री दादा भुसे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, उद्योग मंत्री उदय सामंत, माजी मंत्री सुरेशदादा जैन, आमदार एकनाथ खडसे यांच्यासह राज्यातील अनेक खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. यांनी दिल्या प्रत्यक्ष शुभेच्या यावेळी उद्योगपती अशोक जैन, आमदार राजूमामा भोळे, आमदार अमोलदादा पाटील, आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे,आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल जावळे, आमदार किशोर आप्पा पाटील, सोनवणे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, रावसाहेब पाटील, माजी खासदार उन्मेश पाटील JDCC बँकेचे चेअरमन व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संजय पवार महिला आघाडीच्या सहसंपर्कप्रमुख सरिता कोल्हे-माळी, शोभाताई चौधरी, उपजिल्हाप्रमुख रवी कापडणे, अनिल भोळे, पी. एम. पाटील, महानगरप्रमुख संतोष पाटील, युवासेना जिल्हाध्यक्ष रोहित कोपटा, भाजपचे ज्येष्ठ नेते सुभाष अण्णा पाटील, अमोल शिंदे, ज्ञानेश्वर महाजन, संजय महाजन, जि.प. सदस्य प्रतापराव पाटील, पवन सोनवणे, गोपाल चौधरी, पाळधीचे सरपंच विजय पाटील, शरद कोळी, माजी सभापती राजेंद्र चव्हाण, डॉ. कमलाकर पाटील, प्रेमराज पाटील, रमेश आप्पा पाटील, अर्जुन पाटील, सचिन पवार, भानुदास विसावे, समाधान चिंचोरे, नगरसेवक गणेश सोनवणे, कुंदन काळे, हर्षल मावळे, आशुतोष पाटील, अॅड. पोकळे , भुसावळ प्र. नगराध्यक्ष शैलजा नारखेडे यांच्यासह जिल्हाभरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, उपस्थित मान्यवरांच्या मोठ्या संख्येइतकाच सामान्य नागरिकांचा आणि शिवसैनिकांचा उत्स्फूर्त सहभागही या अभिष्टचिंतन सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरला.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## शेतीचे भविष्यातील नायक फालीमधून घडतील : जैन

### कृषी इनोव्हेशनमध्ये उदयचल स्कूल प्रथम



जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** "शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील हसू हाच माझा खरा पुरस्कार आहे," असे माझे वडील श्रद्धेय मोठेभाऊ नेहमी सांगत असत. त्यांचा विचारांचा वारसा पुढे नेत आज फाली (FALI) उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास आणि समाधान पाहून भारतीय शेतीचे भविष्यातील खरे नायक याच विद्यार्थ्यांमधून घडतील, असा ठाम विश्वास वाटतो, असे प्रतिपादन जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी केले. फालीच्या दुसऱ्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कृषी बिझनेस प्लॅन आणि कृषी इनोव्हेशन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव अशोक जैन यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी जैन इरिगेशनच्या तंत्रज्ञानामुळे देशातील केळी उत्पादनात झालेल्या क्रांतीवरही प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ठिबक सिंचन, टिश्यू कल्चर आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानामुळे जळगावसह देशभरातील केळी लागवडीत मोठी वाढ झाली आहे. जळगावातून सुरू झालेली ही वाटचाल आज महाराष्ट्र, कर्नाटक ते मणिपूरपर्यंत पोहोचली असून टिश्यू कल्चरद्वारे विकसित करण्यात आलेल्या 'ग्रँड नाईन' जातीच्या केळीची मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे. मागील वर्षी भारतातून सुमारे ४,४०० कोटी रुपयांच्या केळीची निर्यात झाली असून देशाच्या फळ निर्यातीमध्ये केळीने प्रथम क्रमांक मिळविल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक बाजारपेठेत भारताचा सुमारे पाच टक्के वाटा असून २०४७ पर्यंत देशाची केळी निर्यात पाचपट वाढण्याची क्षमता असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हवामान बदल, वादळे आणि गारपिटीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी केळी उत्पादनासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच आगामी काळात केळीच्या दोन नव्या जाती बाजारात आणण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. फालीच्या कृषी इनोव्हेशन आणि कृषी बिझनेस प्लॅन स्पर्धेत देशभरातील ५३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कृषी इनोव्हेशन सादरीकरणात मुंबईच्या विक्रोळी येथील उदयचल हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकावला, तर बारामतीच्या शारदाबाई पवार विद्यानिकेतनने द्वितीय स्थान मिळविले. भंडारा जिल्ह्यातील मार्तंडराव पाटील कपगटे हायस्कूल तृतीय, रावजी फटे विद्यालय चौथे आणि नागपूरच्या मोहपा येथील न्यू इंग्लिश स्कूल पाचव्या क्रमांकावर राहिले. कृषी बिझनेस प्लॅन स्पर्धेत बारामतीच्या शारदाबाई पवार विद्यानिकेतनने प्रथम क्रमांक मिळविला. चोपडा तालुक्यातील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय द्वितीय, एस.एस. पाटील विद्यामंदिर तृतीय, पुणे जिल्ह्यातील कुलस्वामी खंडेराय विद्यालय चौथे आणि मुंबईच्या उदयचल हायस्कूलने पाचवा क्रमांक पटकावला. यावेळी फालीचे विद्यार्थी कार्तिक कुमार (मुंबई), तनिष्का बडगुजर (बडवानी, मध्य प्रदेश), शर्वरी चव्हाण (बारामती) आणि सुज्ञा हडवळे (जुन्नर) यांनी आपल्या अनुभवांना उजाळा दिला. माजी विद्यार्थी कृतिका लकडे आणि अजिंक्य डोंगरे यांनीही या उपक्रमामुळे झालेल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगतीबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात गोदरेज अॅग्रोवेट, आयटीसी, स्टार अॅग्री, प्रॉम्पट, अमूल आदी कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. फालीच्या उपाध्यक्षा नॅन्सी बेरी यांनी भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली, तर मुख्य कार्यकारी अधिकारी शर्बोनी पोदार यांनी आगामी काळात फालीचा विस्तार देशातील सर्व राज्यांमध्ये करण्याचा संकल्प व्यक्त केला. दरम्यान, फाली संमेलनाचा तिसरा आणि समारोपाचा टप्पा ७ व ८ जून रोजी पार पडणार असून विद्यार्थी जैन इरिगेशनच्या शेती संशोधन व विकास केंद्राला भेट देणार आहेत. तसेच बिझनेस प्लॅन आणि इनोव्हेशन स्पर्धेतील अंतिम सादरीकरणानंतर विजेत्यांचा गौरव करून १२ व्या फाली संमेलनाचा समारोप केला जाणार आहे.

---

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपा सिख अल्पसंख्यांक मोर्चातर्फे वृक्षारोपण अभियान

जन सम्राट टाईम्स

**पुणे। प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी सिख अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूर येथील वरवे गावात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विविध प्रकारच्या सुमारे ३० वृक्षांची लागवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टी सिख अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष जसप्रीत सिंग सलुजा यांच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियानाची



सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रकाश भरत, सुखदेव बोरडे, विशाल वरुटे, लालचंद यादव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्रदेशाध्यक्ष जसप्रीत सिंग सलुजा म्हणाले की, "निसर्गाचे संरक्षण आणि पर्यावरणाचा समतोल राखणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज बनली असून प्रत्येकाने या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा." पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले असून भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

---

## पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कानळदा येथे वृक्षारोपण

जन सम्राट टाईम्स

**कानळदा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबरावजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कानळदा ग्रामपंचायतीच्या वतीने वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळा, कानळदा तसेच गावातील स्मशानभूमी परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण



संवर्धनाचा संदेश देत ग्रामपंचायतीने सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम आयोजित केला. यावेळी कानळदा गावचे प्रथम नागरिक तथा माजी सरपंच अॅड. पुंडलिक बापू सपकाळे, ग्रामपंचायत सदस्य आयु. जगदीश भाऊ सपकाळे, किशोर भाऊ सपकाळे, भिकन भाऊ सपकाळे, निवृत्ती भाऊ बोरले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जितेंद्र भाऊ सपकाळे, दिनेश भाऊ सपकाळे, प्रा. चंद्रकांत सोनवणे, प्रा. टोके सर, प्रा. संदीप पाटील, अंगणवाडी सेविका शोभा पवार तसेच जिल्हा परिषद मराठी मुलांच्या शाळेतील सर्व शिक्षिका आणि कानळदा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जामनेरमध्ये बनावट कापूस बियाणे विक्री रॅकेटचा पर्दाफाश!

### प्रोबेशनरी डीवायएसपी प्रशांत दरेकर यांची धडक कारवाई; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जामनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची फसवणूक करून अनधिकृत व संशयित बनावट कापूस बियाण्यांची विक्री करणाऱ्या रॅकेटचा जळगाव पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. प्रोबेशनरी उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) प्रशांत दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे ९ लाख १५ हजार ४१६ रुपये किमतीचा बियाण्यांचा साठा जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध विविध कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कृषी विकास अधिकारी, पंचायत समिती जामनेर यांची फिर्याद नोंदविण्यात आली आहे. पोलिसांना जामनेर शहरातील साईनगर परिसरात राहणारे दीपक राजमल चौधरी यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात कापूस बियाण्यांचा अनधिकृत साठा करून त्याची विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला असता घरामध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस बियाण्यांच्या गोण्या आणि पॅकेट्स आढळून आली. कारवाईदरम्यान ४० गोण्या आणि १,०१६ बियाण्यांची पॅकेट्स जप्त करण्यात आली. या पॅकेट्सवर विविध कंपन्यांची नावे आणि बॅच क्रमांक नमूद करण्यात आलेले



होते. मात्र तपासणीवेळी संबंधित व्यक्तीकडे बियाणे विक्रीचा वैध परवाना, साठा परवाना किंवा विक्रीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे उघड झाले. तसेच जप्त करण्यात आलेल्या बियाण्यांच्या खरेदी-विक्रीसंदर्भात कोणतेही समाधानकारक पुरावेही सादर करण्यात आले नाहीत. पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आलेल्या सर्व बियाण्यांची एकूण किंमत ९ लाख १५ हजार ४१६ रुपये इतकी आहे. प्राथमिक तपासात संबंधित बियाणे उत्पादक कंपनीची अधिकृत परवानगी न घेता ही बियाणे बाजारात विक्रीसाठी आणण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्रोबेशनरी उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) प्रशांत दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे ९ लाख १५ हजार ४१६ रुपये किमतीचा बियाण्यांचा साठा जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध विविध कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाच्या मते, अशा प्रकारच्या अनधिकृत आणि संशयित बियाण्यांच्या विक्रीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याची तसेच निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणी दीपक राजमल चौधरी (रा. साईनगर, जामनेर), गुलाब आधार पाटील (रा. वर्डी, ता. पाचोरा), शेषराव पाटील (रा. वर्डी, ता. पाचोरा) तसेच इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३, बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ तसेच इतर संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी आणि परवाना तसेच बिलाची खात्री करूनच व्यवहार करावा, असे आवाहन कृषी विभाग आणि पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज


## कॉक्रोच जनता पार्टीचे आज दिल्लीत आंदोलन; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

### जंतरमंतरवरील आंदोलनासाठी परवानगीबाबत संभ्रम; पोलिसांकडे अद्याप अर्जच नाही

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । प्रतिनिधी:** 'नीट'च्या कथित पेपरफुटी प्रकरणावरून विद्यार्थ्यांमधील असंतोषाच्या पार्श्वभूमीवर कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) आज (शनिवार) राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन करण्याच्या तयारीत आहे. पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके अमेरिकेतून दिल्लीत दाखल होणार असून, आंदोलनाला प्रशासनाकडून परवानगी मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दिल्ली पोलिसांनी मात्र अद्याप या आंदोलनासाठी कोणताही अधिकृत परवानगी अर्ज प्राप्त झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. आंदोलनासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करून आवश्यक नियमांनुसार निर्णय घेतला जाईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनाही करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. सीजेपीने 'नीट'च्या कथित पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासह केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर अभिजित दीपके दिल्लीत दाखल झाल्यानंतर सरकारची भूमिका काय असेल आणि आंदोलनाला परवानगी मिळेल की नाही,






याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, 'सेव्ह इंडिया फाउंडेशन'ने दाखल केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. याचिकेत, आवश्यक परवानगी न घेता विशेषतः राष्ट्रीय राजधानीत पाच लाख किंवा त्याहून अधिक लोक एकत्र येण्याचे आवाहन करणे ही गंभीर बाब असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच आंदोलनाच्या आयोजकांनी सुरक्षाव्यवस्था, गर्दीचे नियोजन आणि शांततापूर्ण आयोजनाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नसल्याचाही उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे. नागरिकांसाठी काही मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. प्रत्येक आंदोलकाने सोबत राष्ट्रध्वज आणि एक पुस्तक आणावे, तसेच आंदोलन शांततेत आणि कायद्याचे पालन करून पार पाडावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शक्यतो एकटे न येता कुटुंबासह सहभागी व्हावे, असेही पक्षाने म्हटले आहे. याशिवाय, आंदोलकांनी कोणत्याही प्रकारच्या उपद्रवी कृतींपासून दूर राहावे, संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, पुरेसे पाणी पिऊन आरोग्याची काळजी घ्यावी आणि उपाशीपोटी आंदोलनस्थळी येऊ नये, अशा सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत.

### आंदोलनाकडे प्रशासनाचे लक्ष लागले

पोलिसांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी फुले अर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले असून ट्रोलिंग किंवा चिथावणीखोर व्यक्तींशी कोणताही संपर्क ठेवू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आज होणाऱ्या प्रस्तावित आंदोलनाकडे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि प्रशासनाचे लक्ष लागले असून परवानगी, सुरक्षाव्यवस्था आणि आंदोलनाची व्याप्ती याबाबत पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.